REGISTERED No. B. 3434




# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख ३० जून, १९४८ | अंक २६

## दि बॉंबे प्रॉव्हिन्शिअल को. बँक लि.

हेड ऑफिसः--९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई
स्थापना : १९११
चेअरमनः--श्री. रमणलाल जी. सरय्या, ओ. बी. ई.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | २०,३३,००० रु. |
| गंगाजळी | ... ... | २७,१२,००० रु. |
| एकूण ठेवी | ... ... | ६,४१,३४,००० रु. |
| खेळतें भांडवल | ... ... | ७,७७,३३,००० रु. |

११ जिल्ह्यांत मिळून ५१ शाखा.

मुंबई प्रांतांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली बँक.

★ हिंदुस्थानांतील महत्त्वाच्या कित्येक शहरांतील बँकांशीं वसुलीची व्यवस्था केली आहे.

★ वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

--अटीसाठी चौकशी करावी--

वा. पुं. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई



टे. नं. ३१६७५

| | | |
|---|---|---|
| विक्रीस काढलेलें भांडवल | | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ४,०९,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,२७,००० |
| ठेवी | ... | रु. ८०,२१,००० |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ८७,६७,००० |

बचतीच्या आकर्षक योजना

—विशेष माहितीसाठी लिहा अगर भेटा

सब-ऑफिस : —दादर— ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्.
चेअरमन

एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्.
सेक्रेटरी

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—लालगीर चेंबर्स, फोर्ट, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे.

आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे
मॅनेजिंग डायरेक्टर

—महाराष्ट्रांतील—
प्रगमनशील व अग्रेसर विमा संस्था

## दि औंध म्युच्युअल इन्शूरन्स सोसायटी लि. पुणें २

*—आमचीं वैशिष्ट्यें—*

( १ ) काटकसरीचा कारभार ( २ ) खर्चाचें अल्प प्रमाण ( ३ ) क्लेम्स तावडतोब पटविणें ( ४ ) एजंटास कायमचें व वंशपरंपरागत कमिशन ( ५ ) माफक हप्त्याचे दर.

विमा अथवा एजन्सी यासाठी लिहा अगर भेटा.

—मॅनेजिंग डायरेक्टर

वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८'—१०")
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**पाकिस्तानला रशिआकडून कापड मिळणार**—पाकिस्तान सरकार रशिआकडून ५० लाख वार कापड आणि झेकोस्लोव्हाकिआकडूनहि ५० लाख वार कापड आयात करणार आहे, असें समजतें.

**मुंबई प्रांतांतील अंध**—मुंबई प्रांतांत सुमारें ५०,००० माणसें पूर्णपणें आंधळीं असून त्याच्या तिप्पट अंशतः आंधळीं आहेत. अंधांची व्यवस्था पाहणाऱ्या संस्था मुंबई प्रांतांत अवघ्या १० आहेत. त्यांचा फायदा फक्त ४०० आंधळे घेऊं शकतात. ह्या बहुतेक संस्था आर्थिक दृष्ट्या सुस्थितींत नसल्यामुळें, कित्येक अंधांचे प्रवेशअर्ज ह्या संस्थांना फेटाळावे लागतात. ह्या अंधांची जेवण्या-राहाण्याची सोय करण्याचें सामर्थ्य संस्थांपाशीं नसतें.

**१९५१ सालीं खानेसुमारी**—१९५१ सालीं हिंदुस्थानांतील लोकांची शिरगणती करण्याची तयारी हिंदुस्थान सरकारनें चालविली आहे. शिरगणतीचे कमिशनर मि. यीट्स् हे नुकतेच प्रांतांचा व मोठ्या संस्थानांचा दौरा उरकून आले. ह्या शिरगणतींत लोकसंख्येची मोजणी तर होईलच पण शिवाय लोकांची रहाण्याची जागा, आर्थिक परिस्थिति आणि वयाचे गट ह्यासंबंधीही माहिती गोळा करण्यांत येणार आहे.

**जपानच्या राजाचा तनखा वाढणार**—जपानच्या हिरोहिटो राजाचा तनखा अडीच पटीनें वाढून आतां ह्या तनखा वार्षिक ४ लाख पौंडांप्रमाणें मिळणार आहे. अर्थात ह्या वाढीला जपानमधील दोस्त नियंत्रण मंडळाची व जपानच्या पार्लमेंटच्या संमतीची जरूरी आहे.

**आग्रा येथें सायकलींचा कारखाना**—हिंदुस्थानांत सायकली तयार करण्याच्या कारखान्याची यंत्रसामुग्री आणण्यासाठी चौघे उद्योगपती इंग्लंडला गेले आहेत. हा कारखाना आग्रा येथें उभारण्यांत यावयाचा आहे. त्यासाठी १० लाखांचें भांडवल लागेल. कारखान्यांत रोज २०० सायकली तयार होतील.

**प्रत्येक निर्वासितास दरमहा किमान १०० रु.**—प्रत्येक निर्वासित दरमहा किमान १५० रु. मिळवूं शकेल, असा मी प्रयत्न करीन, असें श्री. मोहनलाल सक्सेना, निर्वासितांच्या प्रश्नाचे मध्यवर्ती सरकारचे मंत्री, हे नुकतेच एका भाषणांत म्हणाले.

**इंग्लंडच्या चर्चेवर धर्माधिकाऱ्याची टीका**—इंग्लंडमधील आर्चबिशप कमिशननें, "कांहीं विशिष्ट परिस्थितींत युद्धांत ॲटम बॉंब वापरणें योग्य ठरेल; म्हणून ज्या राष्ट्रांजवळ असे बॉंब्स आहेत त्यांनीं त्यांचा विध्वंस करूं नये" असें मत प्रगट केलें होतें. ह्या मतावर डॉ. ह्यूलेट जॉन्सन ह्यांनी नुकतीच कडक टीका केली. ॲटम बॉंबचा युद्धांत उपयोग करूं नये असें शास्त्रज्ञांनीं मत व्यक्त केलें असतांना धार्मिक म्हणविणाऱ्यांनीं उलट मत द्यावें, ह्यावरून शास्त्रज्ञांची नीतिमत्ता धार्मिक वृतीच्या लोकांपेक्षा अधिक श्रेष्ठ दर्जाची ठरत नाहीं काय? असा सवाल डॉ. ह्यूलेट जॉन्सन ह्यांनीं केला आहे.

**चितगांवच्या व्यापाराबाबत हुंड्या**—चितगांव बंदरांतून निर्गत होणाऱ्या मालांतून निर्माण होणाऱ्या हुंड्यांचा व्यवहार कलकत्ता येथील बँकांमार्फत होतो. ही व्यवस्था १ जुलै, १९४८ पासून बंद होईल, असें हिंदी रिझर्व्ह बँकेनें जाहीर केलें आहे. निर्गत करणारांनीं पाकिस्तानी बँकांमार्फत व्यवहार करावा.

**लाखेच्या धंद्याला धोका**—युद्धापूर्वी हिंदुस्थान जगांतील ९० टक्के लाख उत्पन्न करीत असे. उरलेल्या १० टक्के उत्पादनांत सयाम, इंडोचायना व ब्रह्मदेश ह्यांचा वाटा असे. कच्च्या लाखेचें शुद्ध लाखेंत रूपांतर करण्याचें काम तर फक्त हिंदुस्थानांतच होई. परंतु, युद्धोत्तर काळांत सयाम हिंदुस्थानपेक्षां अधिक लाख निर्माण करून व शुद्ध करून ती अमेरिकेला व इतर परदेशांना निर्यात करूं लागला आहे. हिंदुस्थानच्या लाखेच्या उत्पादनाच्या २५ टक्के निर्यात १९४७ सालच्या पहिल्या नऊ महिन्यांत बँकॉकहून झाली. ही परिस्थिति लक्षांत घेऊन लाखेच्या धंद्यानें आपलें उत्पादन वाढवून, त्याचा दर्जा राखून शिवाय किंमतीही योग्य ठेवणें जरूरीचें झालें आहे. ह्या शिवाय, कृत्रिम लाखेची स्पर्धा उत्पन्न झाली आहे ती निराळीच. हिंदुस्थानांत शुद्ध लाख तयार करण्याच्या धंद्यांत ३० हजार कामगार गुंतले असावेत असा अंदाज आहे. त्या सेरीज लाखेच्या झाडापासून कच्ची लाख गोळा करण्याच्या कामांत ३० लाख कुटुंबें गुंतलेलीं आहेत. ह्या सर्वांचें भवितव्य लाखेच्या उत्पादनावर अवलंबून आहे.

**रिझर्व्ह बँकेचा पाकिस्तानांतील व्यवहार बंद होणार**—१ जुलै १९४८ पासून रिझर्व्ह बँकेचा पाकिस्तानांतील व्यवहार बंद होईल व ती तेथील व्यवहार स्टेट बँक ऑफ पाकिस्तानच्या स्वाधीन करील. ३० सप्टेंबर अखेर हिंदी रुपया पाकिस्तानांत कायदेशीर नाणें म्हणून नांदेल. स्टेट बँक ऑफ पाकिस्तान ही हिंदी रिझर्व्ह बँकेप्रमाणें पाकिस्तानची मध्यवर्ती बँक म्हणून काम करूं लागेल. हिंदी बँकांच्या पाकिस्तानांतील शाखा पाकिस्तानी मध्यवर्ती बँकेच्या शेड्यूलमध्यें दाखल होतील.

**धान्याची आयात**—१० जुलै, १९४८ अखेर संपणाऱ्या महिन्यांत हिंदुस्थानांत ३,१६,००० टन धान्य बाहेरून येणार आहे. ६० आगबोटी तें काम करीत आहेत. ह्या धान्यापैकी २,४०,००० टन गहूं व तांदूळ आहे.

तयार कपड्यांचे व्यापारी महिंद्रकर ब्रदर्स गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील-
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, हमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ३० जून १९४८




प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## भांडवलाची चणचण असतांना आर्थिक उन्नति कशी होणार?

### उद्याच्या सुस्थितीसाठी आज स्वार्थत्यागाची आवश्यकता

हिंदुस्थानांत आतां नव्या उद्योगधंद्यांस भांडवल मिळणें कठीण जात आहे. कित्येक नव्या कंपन्यांस कोटयवधि रुपयांचें नवें भांडवल उभारण्याची 'कंट्रोल ऑफ कॅपिटल इश्यूज' योजनेखाली सरकार दर आठवड्यास परवानगी देत आहे. परंतु, त्या परवानगीचा फायदा कंपन्या घेऊं शकतात का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ज्यांना भांडवल उभारणीस सरकारनें परवानगी दिली, अशा कंपन्या किती भांडवल प्रत्यक्ष गोळा करूं शकल्या ह्याचे आकडे जर प्रसिद्ध झाले, तर ते बरेच उद्बोधक होतील. कंपन्यांकडील ठेवींचा ओघहि मंदावला आहे आणि भांडवलाची सर्वांनाच चणचण भासूं लागली आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी नवे उद्योगधंदे काढण्याची वावटळ आली होती, परंतु आतां कांहींसे निरुत्साहाचें वातावरण पसरलें आहे. नवे कारखाने उभारण्याचा व कारखान्यांतील खातीं वाढविण्याचा विचार कित्येकांनीं सोडून दिला आहे आणि चालू उत्पादन कायम ठेवणेंहि अवघड भासत आहे.

खाजगी प्रयत्नांची स्थिति वरीलप्रमाणें आहे. परंतु, सरकारी पुनर्घटना योजनांस तरी भांडवलाच्या भरपूर पुरवठ्याची निश्चिती आहे काय? कर्जे काढून व तूट सोसून मध्यवर्ती व प्रांतिक सरकारें किती काळ आपला भांडवली खर्च चालू ठेवूं शकतील? खर्चाचा शक्य तेवढा मोठा भाग सरकारी चालू उत्पन्नांतून भागविणें इष्ट आहे, परंतु सरकारचीं अंदाजपत्रकें ह्यापुढें मोठ्या वाढाव्याचीं होऊं शकतील, ही अपेक्षा फोल आहे. त्या कारणानें, चलनविस्तारास व महागाईस कारणीभूत होणाऱ्या मार्गाचा अवलंब करणें सरकारास आज भाग पडत आहे. बंदिस्त फंडांचें चलनांत रूपांतर होत आहे. सरकारनें कर्जे उभारून आपल्या भांडवली खर्चाची व्यवस्था करावयाचें म्हटलें, तरी सरकारी कर्जरोखे जनतेला पुरेसे आकर्षक वाटले पाहिजेत. आर्थिक परिस्थितीचा ताण, राजकीय घडामोडींचें स्वरूप, इत्यादि बाबी ह्यासंबंधांत दृष्टीआड करून भागणार नाहीं.

हिंदुस्थानास आपली उत्पादन-क्षमता वाढविणेंची असेल, तर भांडवलाची निर्मिति व संचय हीं अत्यंत महत्त्वाचीं आहेत. आजच्या तंगीच्या परिस्थितींतहि बचत करून, उद्याच्या सुस्थितीसाठीं तरतूद केल्यानेंच भांडवल निर्माण होणें शक्य होईल. आजची कठीण अवस्था त्यामुळें अधिकच बिकट होईल, हें खरें; परंतु, कालांतरानें उत्पादन वाढून लोकांच्या वाट्यास अधिक जिनसा येऊं लागतील. ज्या प्रमाणांत समाजाची बचत आज वाढेल, त्या प्रमाणांत पुढें मिळणाऱ्या स्वास्थ्यांत भर पडेल. पूर्वी तहकूब ठेवलेले भांडवली खर्च आपणांस अद्याप करावयाचे आहेत आणि त्यानंतर पुढील योजना पार पाडावयाच्या आहेत. ह्यामुळें, भांडवली खर्च किती केला तरी तो अपुराच ठरणार आहे. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारांनीं मोठमोठ्या योजना हातीं घेतल्या आहेत, त्यांस नियोजित गति प्राप्त झाली म्हणजे भांडवली खर्च केवढा करावा लागेल ह्याची स्पष्ट कल्पना येईल. भरभराटीच्या काळांत लहान वाटणारे आकडे आतां भीतिदायक वाटूं लागतील आणि पूर्वी जी रकम सरकार सहज उभी करूं शकलें असतें, ती आतां आवाक्याबाहेर ठरेल. समाजाच्या सर्वोन्नतीसाठी केवळ धरणें, वीजकेंद्रें, इत्यादींच पुरणार नसून रहाण्यासाठीं घरें, इस्पितळें, शाळा, इत्यादींचीहि मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. सरकारास त्याची जाणीव असल्याकारणानें, ह्याहि संबंधांत त्यानें विस्तृत योजना आखल्या आहेत. त्याचप्रमाणें यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, शिक्षक, परिचारिका, प्रचारक, इत्यादी तयार करण्यासहि कमी खर्च लागणार नाहीं. हा सर्व खर्च येणार कोठून? तो कशांतून भागवला पाहिजे? समाजाच्या कांहीं दैनंदिन गरजा अपुऱ्या ठेवूनहि बचतीच्या मार्गानेंच ह्या भांडवली खर्चाची तरतूद करावी लागेल हें उघड आहे. हिंदुस्थानास इंग्लंड, अमेरिका सारख्या राष्ट्रांस प्रगतीचे शर्यतींत गाठावयाचें असल्यास, आपणांस अजून किती चढ चढावयाचे आहेत व वळणें घ्यावयाचीं आहेत ह्याची कल्पनाच केलेली बरी. रशियानें आपल्या वार्षिक उत्पन्नाचा शक्य तेवढा भाग भांडवली खर्चासाठीं बाजूस काढूनच अल्पकाळांत मोठी प्रगति घडवून आणली आहे. रशियाचें हें उदाहरण आपणांस मार्गदर्शक होण्याजोगें आहे. हिंदी लोकांनीं व सरकारनें शक्य तेवढ्या काटकसरीनें व कार्यक्षमतेनें आपले संसार चालवून ती बचत उत्पादक कामीं लावली पाहिजे. अशा तऱ्हेनें पोटास चिमटा घेऊन बचत करणें लोकांना आकर्षक वाटेल, असें सरकारी औद्योगिक व आर्थिक धोरण पाहिजे, आणि त्यांत सातत्यहि पण हवें. सरकारी धोरण जनतेंत आवश्यक तो विश्वास निर्माण करूं शकलें नाहीं, तर बचतीस प्रोत्साहन न मिळतां, मिळेल तो पैसा खर्च करून टाकण्याचा मोह लोकांत निर्माण होईल व तो देशास घातुक ठरेल.

स्थानिक भांडवलाचा संचय होईपर्यंत वाट बघत बसणें देशहिताचें नाहीं. परराष्ट्रीय भांडवल स्वीकारूनहि, हिंदी औद्योगिक प्रगतीस त्वरित चालना देणें इष्टच होईल. परराष्ट्रीय भांडवल हिंदुस्थानांत गुंतवलें जाईल, त्यास आवश्यक तें तारण व हमी हीं लागणारच आणि तीं देणें आपणांस नाकारतां येणार नाहीं. आपल्या आत्मविश्वासाचा हा प्रश्न आहे, आणि तो निर्माण होणें हीहि आज अत्यंत जरूरीची बाब आहे. कर्जदारास सावकाराची भीति का वाटावी? कर्जदारानें मिळालेल्या कर्जाचा उत्पादक कार्यासाठीं चांगला उपयोग केला आणि आपली शक्ति वाढवली, तर सावकार कर्जदाराचें काय नुकसान करूं शकणार? हिंदी प्रगतीच्या मार्गांतील भांडवलाचा प्रश्न सोडविण्याच्या ह्या सर्व मार्गांचा अवलंब अलगपणें न करतां, एकसमयावच्छेदेंकरून केला आणि सरकार, अधिकारी व जनता ह्यांनीं त्यास मनापासून पाठिंबा दिला तर थोड्याच अवधींत आपणांस त्याचीं फळें अनुभवास येतील.

## नाणावटी कमिटीच्या शिफारसींची अंमलबजावणी

(१)

### ॲ. क्रे. कॉर्पोरेशन

सर मणिलाल नाणावटी ह्यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई सरकारनें नेमलेल्या ॲग्रिकल्चरल क्रेडिट ऑर्गनायझेशन कमिटीच्या रिपोर्टावरील सरकारच्या कृतीकडे लोकांचें लक्ष वेधलें आहे. ॲग्रिकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशनचें काम सध्याच्या सहकारी संस्था, थोडीशी त्यांची पुनर्घटना केल्यावर आणि सरकारी मदतीनें करूं शकतील असा नाणावटी कमिटीचा अभिप्राय आहे. तो लक्षांत घेऊन, अशी स्वतंत्र कॉर्पोरेशन काढण्याची आवश्यकता नाहीं असें सरकारनें ठरविलें आहे. कॉर्पोरेशनचें काम हातीं घेणाऱ्या सर्व सहकारी संस्थांच्या कारभारांत एकसूत्रीपणा असण्याची आवश्यकता त्यांच्या प्रतिनिधींनीं मान्य केलेलीच आहे.

### क्रेडिट सोसायट्यांचे प्रकार

ज्या क्रेडिट सोसायट्यांनीं नॉन क्रेडिट व्यवहार करण्यास प्रारंभ केला आहे, त्यांना मल्टिपर्पज सोसायटी असें संबोधण्यांत यावें आणि खेडेगांवांतील वेगवेगळ्या प्रकारच्या सोसायट्यांचीं अनेक नांवें घोटाळा उत्पन्न करतात, तेव्हां सोसायट्यांचे प्रकार कमी केले जावे, ही कमिटीचा सूचना सरकारनें मान्य केली आहे. ह्यापुढें फक्त मल्टिपर्पज सोसायट्याच नव्यानें काढण्यांत याव्या व सध्याच्या खेडेगांवीं सोसायट्यांचें मल्टिपर्पज सोसायट्यांत रूपांतर करण्यांत यावें, ही कमिटीची शिफारसहि पत्करण्यांत आली आहे.

### नियमित व अनियमित जबाबदारी

नियमित अथवा अनियमित, पाहिजे त्या जबाबदारीच्या तत्त्वावर सोसायट्या बनविण्यास शेतकऱ्यांना मोकळीक असावी; मोठ्या जमीनदारांना मर्यादित जबाबदारीची सोसायटी हवी असेल तर त्यांना तशी करता यावी; गरीब जनतेच्या हितास मात्र त्यामुळें बाध येऊं नये, असें कमिटीचें म्हणणें होतें. हें तत्त्व सरकारनें मान्य करून व सहकारी कायद्यांत दुरुस्ती करून योग्य ती कायदेशीर योजना केली आहे. सोसायट्यांच्या कमाल सभासद-संख्येवर बंधन असूं नये हेंहि ठरलें आहे. "नाममात्र" सभासदांची संख्या शक्य तेवढी कमी राखणें आवश्यक आहे; अशा तऱ्हेचें सभासदत्व प्रयोगवजा समजावें आणि त्या प्रयोगाचा आढावा मधून मधून घेण्यांत यावा ह्या सर्वांस सरकारची मान्यता आहे.

मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर बड्या शेतकऱ्यांसाठी को. क्रेडिट असोसिएशन्स नोंदण्यास हरकत नाहीं; इतर पतपेढ्यांपेक्षा मोठालीं कर्जें तिला मंजूर करता यावींत, ही शिफारसहि सरकारनें मान्य केली आहे. नियमित जबाबदारीच्या सोसायटीनें द्यावयाच्या कर्जासंबंधीं सहकारी कानूंतील आठवा कानू कमिटीच्या सूचनेप्रमाणें बदलण्यांत आला आहे.

### कर्जांची मर्यादा

सध्याच्या चढीच्या किंमती व शेतीच्या खर्चांत झालेली वाढ हीं लक्षांत घेऊन अल्प मुदतीच्या कर्जाची मर्यादा २०० रु. ची ३०० रु. व मध्यम मुदतीच्या कर्जाची मर्यादा ४०० रु. ची ५०० रु. करण्यांत यावी; व्यक्तिगत कर्जाची रकम ठरवितांना कर्जदाराच्या जिंदगीचा व परतफेडीच्या पात्रतेचाहि विचार व्हावा, अशी कमिटीची शिफारस आहे. कर्जाची मर्यादा वाढविण्यास सरकार तयार आहे, परंतु मोठ्या इसमांना दिलेल्या कर्जांत सोसायटीचा पैसा गुंतून जाऊं नये आणि गरीब शेतकऱ्यांचीहि सोय पाहिली जावी ह्या दृष्टीनें ह्या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. रजिस्ट्रारनें सध्याची पद्धति विचारांत घेऊन आपला अभिप्राय सरकारास सादर करावयाचा आहे.

### स्थानिक ठेवींस उत्तेजन

सहकारी पतपेढ्या ह्या खेडेगांवीं बँका बनाव्यात आणि स्थानिक ठेवी ह्याच त्यांच्या भांडवलाचा मुख्य आधार असावा, असें कमिटीनें सांगितलें. सेव्हिंग्ज ठेवी घेण्यास मल्टिपर्पज सोसायट्यांना त्यांच्या नियमांनीं परवानगी दिलेलीच आहे; परंतु सभासदांच्या व इतर स्थानिक ठेवींस उत्तेजन देण्याच्या प्रश्नावर रजिस्ट्रारकडून रिपोर्ट मागविण्यांत आला आहे.

### तत्परतेनें कर्ज मिळण्याची सोय

सोसायट्यांनीं कर्जास मंजुरी देण्याबाबत कमिटीनें सध्यापेक्षा अधिक तत्परतेची व सोईची अशी पद्धति सुचविली आहे. कर्जदारांना एका रकमेनें सबंध कर्ज न देता, जरूरीप्रमाणें त्यांना तें हप्त्या-हप्त्यानें घेतां यावें; त्याचप्रमाणें हंगामाच्या अखेरीच्या कामासाठी जादा कर्ज मिळण्याची व्यवस्था व्हावी; कॅशक्रेडिट पद्धतीहि सुरू करावी, हें मान्य आहे.

---

## कंझूमर्स सोसाट्यांचे संबंधांत दोन नवे कानू

मुंबई सहकारी कानूमध्यें दोन नव्या कानूंची भर घालण्याचें सरकारनें योजिलें आहे. त्यास कोणाचा विरोध असल्यास किंवा कोणास त्याबाबत सूचना करावयाच्या असल्यास, सरकारकडे आपलें म्हणणें ५ जुलैपूर्वी लिहून पाठवावें.

### सभासदत्व नाकारतां येणार नाहीं

४५ अ ह्या नव्या कानूमुळें कंझूमर्स सोसायटीस नवे सभासद करून घेतांना आज जो व्यापक अधिकार आहे, तो मर्यादित होणार आहे. सोसायटीच्या नियमाप्रमाणें एखादा मनुष्य तिचा सभासद होण्यास पात्र असला व त्यानें सभासदत्वासाठी अर्ज केला तर तो अर्ज ह्या पुढें सोसायटीला नाकारतां येणार नाहीं. योग्य कारण दाखवून मात्र नकार देतां येईल.

### कारभारांत हस्तक्षेप

४७ अ ह्या नव्या कानूमुळें कंझूमर्स सोसायटीच्या कमिटीचे सभासदांवर नियंत्रण येणार आहे. सोसायटीच्या व्यवहाराच्या प्रकारचाच व्यवहार सोसायटीचा सभासद करीत असेल, तर त्याला असिस्टंट रजिस्ट्रारच्या मंजुरीखेरीज सोसायटीच्या कमिटीचे सभासद होतां येणार नाहीं. असा सभासद कमिटीवर निवडून आलाच, तर असिस्टंट रजिस्ट्रारनें तसें लेखी कळविल्यास, त्यास कमिटीवरून काढून टाकण्यांत येईल.

---

**ईजिप्त–हिंदुस्थान व्यापार**—हिंदुस्थान आणि ईजिप्त ह्यांच्या दरम्यान व्यापारी व ऐनजिनसी देवाण-घेवाणीच्या कराराची बोलणीं कैरो येथें नुकतींच सुरू झालीं. हिंदी शिष्टमंडळाचे नेते श्री. कस्तुरभाई लालभाई हे आहेत. ईजिप्तच्या कापसाच्या बदली ताग, तंबाखू आणि गळिताचीं धान्यें पाठविण्याबद्दल वाटाघाटी चालू आहेत. १९४८ च्या पहिल्या सहामाहींत ईजिप्तच्या निर्यात व्यापारांत हिंदुस्थानचें दुसरें किंवा तिसरें स्थान आहे.

**स्पेनमध्यें आर्थिक अरिष्ट**—स्पेनमधील आर्थिक परिस्थिति घसरत चालली आहे. कंपन्यांचीं दिवाळीं निघत असून बेकारीही वाढत चालली आहे. स्पेनमधील बँका खाजगी उद्योगधंदेवाल्यांना कर्जें देण्याचें नाकारीत असून, दिलेलीं कर्जें परत मागत आहेत. ही आर्थिक घसरगुंडी थांबविण्यासाठी स्पॅनिश सरकार अमेरिकेकडून डॉलर्सचें कर्ज मिळविण्याच्या खटपटींत असल्याची वार्ता आहे.

## दि डेक्कन पॉटरीज अँड अलाईड इंडस्ट्रीज लि.

### कपबशांचें उत्पादन लवकरच सुरू होणार.

ही कंपनी मे, १९४७ मध्यें रजिस्टर झाली. कामास उत्तम रीतीनें सुरुवात करतां यावी म्हणून कंपनीनें कमेन्समेंट सर्टिफिकेटसाठीं दीड लाख रुपये, दर्शनी किंमतीचे शेअर्स विक्रीची अट ठेविली होती. तीही योग्य मुदतींत पुरी झाली व अगदीं अल्पावधींत कंपनीनें स्वतःच्या खरेदीच्या जागेत पुणें शहरापासून दहा मैलांचे अंतरावर, चिंचवड रेल्वे स्टेशनजवळ, कारखान्याची इमारत, भट्टी, चिमणी व गोडाऊन शेड बांधून पुरी केलेली आहे. कारखान्यास लागणारा कच्चा माल कंपनीनें मिळविला असून कारखाना सुरू करण्यापुरती मशिनरीही कारखान्यांत येऊं लागली आहे. कच्चा माल व माशिनरीबाबत तूर्त तरी कंपनीस परदेशांवर अवलंबून रहावें लागणार नाहीं.

कंपनीनें या धंद्यांतील तज्ञ मिळविला असून त्यांनीं याच धंद्यांत नांवाजलेल्या कारखान्यांतून वीस वर्षे कामें केलीं असून त्यांच्या देखरेखीखालीं कारखान्यांत तयार होणारा माल निःसंशय उच्च प्रतीचा व्हावा असा कंपनीस भरंवसा वाटतो. पॉटरी तज्ञ हे मॅनेजिंग एजन्सीचे भागीदारच आहेत. कंपनी मुख्यतः कपबशा, बरण्या, रिफ्रॅक्टरीज, कौलें, सॅनिटरी वेअर्स वगैरे माल तयार करणार आहे. परंतु हॉटेलच्या धंद्याची वाढ फारच झपाट्यानें होत असल्यामुळें व कपबशांची उपयुक्तता खेडोपाड्यांतसुद्धा पटूं लागल्यामुळें सुरवातीस नित्योपयोगी, सुबक कपबशांच्या उत्पादनाचें काम कंपनीनें हातीं घेतलें आहे.

महाराष्ट्रांत मोठ्या प्रमाणांत सुरू होणारा हा पहिलाच कारखाना आहे. कंपनीचे संचालक मण्डळांतील सदस्य वजनदार असून त्यांनीं औद्योगिक क्षेत्रांत बराच काल घालविला असल्यामुळें त्यांचा धंद्यांतील दीर्घ अनुभव कंपनीस निश्चित मार्गदर्शक होईल.

### कर्वे कमिटीचा रिपोर्ट

मुंबई सरकारनें १९४६ अखेरीस नेमलेल्या ॲडमिनिस्ट्रेटिव्ह इन्क्वायरी कमिटीच्या (अध्यक्षः प्रिं. द. गो. कर्वे) शिफारसी प्रसिद्ध झाल्या आहेत. कमिटीनें ८५ अधिकारी व नागरिक ह्यांच्या साक्षी घेऊन व १०२ बैठकींत चर्चा करून आपला रिपोर्ट तयार केला आहे. काटकसर, कार्यक्षमता व जनतेचें कारभाराशीं साहचर्य, ह्या तीन दृष्टींनें कमिटीनें पहाणी केली आहे. सरकारी खर्चाचा तांतडीच्या दृष्टीनें क्रम लावावा, उत्पन्नाच्या बाबींची पहाणी करावी, भाग कमिशनरांची जागा बोर्ड ऑफ रेव्हेन्यूनें घ्यावी, कोर्टास मिळणाऱ्या मुदतीच्या सर्व सुट्ट्या रद्द कराव्या, स्त्रियांना पुरुषांप्रमाणेंच सरकारी नोकऱ्या मोकळ्या असाव्या, सरकारनें नेमण्यांत येणारी जिल्हा रूरल डेव्हलपमेंट बोर्डें रद्द करावीं, जिल्हा लोकल-बोर्डामार्फत जिल्ह्यांच्या कारभाराशीं जनतेचें साहचर्य मिळवावें, लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन्स्टिट्यूटचें स्वतंत्र कायद्यानें प्रस्थापित अशा संस्थेंत रूपांतर करून स्थानिक स्वराज्य संस्थांवरील देखरेख तिचेकडे सोंपवावी, इत्यादि सूचना कमिटीनें केल्या आहेत.

### अमेरिकेंत विजेचा प्रचंड खप

अमेरिकेंत दरमाणशीं विजेचा खप १,४०० कि. वॅ. तास आहे. एवढ्या विजेनें ६० वॅट शक्तीचे ३ दिवे रात्रंदिवस वर्षभर जळत राहूं शकतील. शेतकऱ्यांचा विजेचा उठाव १,८५५ कि. वॅ. तास आहे आणि तो लवकरच ६,००० कि. वॅ. तासांवर जाईल.

### सहकारी गृहमंडळांची प्रगति

बांधकामांवरील नियंत्रणें व महागाई ह्यामुळें सहकारी हौसिंग सोसायट्यांची १९४५-४६ मध्यें उठावदार प्रगति झाली नाहीं. अहमदाबादचें सहकारी हौसिंग सोसायट्यांचे बाबत पुढारीपण कायम आहे. बहुतेक सोसायट्यांनीं अद्याप सी-१ व डी फॉर्म पुरे केलेले नाहींत, हें अनिष्ट होय असें खात्याचा रिपोर्ट म्हणतो. १९४५-४६ मध्यें १२ नव्या सोसायट्या निघाल्या, त्यांतल्या ६ मुंबईत, ५ अहमदाबादमध्यें व १ पुण्यांत अशा निघाल्या.

| | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| सोसायट्यांची संख्या | १२६ | १३६ |
| त्यांचे सभासद | ८,०७८ | ८,५६९ |
| | रु. | रु. |
| भाग भांडवल | २८,२०,७३० | ३१,८०,६४१ |
| सरकारी कर्जें | ६,०६,६५५ | ५,७६,०९४ |
| रिझर्व्ह व इतर फंड | २०,७०,६१३ | २०,०४,७६३ |
| खेळतें भांडवल | ९५,४७,५६४ | १,२८,२४,६०० |

**इंपीरिअल बँकेचें पाकिस्तानांतील स्थान**—पाकिस्तान सरकारनें स्वतःची मध्यवर्ती बँक निर्माण केलीच आहे आणि तेथें मुस्लिम बँकांनाच जास्त वाव मिळणार हें उघडच आहे. इंपीरिअल बँक आज मध्यवर्ती रिझर्व्ह बँकेचीं कांहीं दुय्यम कामें करीत आहे. तीं हबीब बँकेकडे पाकिस्तान सरकार सोंपवील, अशी कांहींची अपेक्षा होती. परंतु जून, १९४९ अखेर इंपीरिअल बँकेसच स्टेट बँक ऑफ पाकिस्तानचे एजंट नेमण्यांत आलें आहे.

**हिंदुस्थान-अमेरिका व्यापार**—अमेरिकेकडून माल आयात करण्यापेक्षां हिंदुस्थानकडून अमेरिकेला माल निर्यात करण्यास अधिक वाव आहे, असे उद्गार हिंदुस्थान सरकारचे सॅन्फ्रॅन्सिस्को मधील वकील श्री. कृपलानी ह्यांनीं नुकतेच काढले. सतरंज्या, रेशीम, मसाल्याचे पदार्थ, गाळिताचीं धान्यें व तागाच्या वस्तू ह्यांचा खप अमेरिकेंत चांगला होऊं शकेल असें त्यांचें मत आहे.

**ब्रिटनमध्यें येणारे अमेरिकन बोलपट**—ब्रिटननें अमेरिकन बोलपटांच्या आयातीवर नुकतींच जीं बंधनें घातलीं, त्यामुळें अमेरिकन बोलपटाच्या धंदेवाल्यांत खळबळ उडालेली आहे. अमेरिकेचे दुय्यम स्टेट सेक्रेटरी मि. लोव्हेट ह्यांनीं ह्या प्रकरणीं एक खलिता ब्रिटिश सरकारकडे पाठविला आहे.

**सिमेंटची किंमत २½ रुपयांनीं उतरली**—मुंबई सरकारनें सिमेंटची किंमत दर टनास ८७ रु ८ आ. होती, ती ८ जून पासून ८५ रु. केली आहे.

**रशियाचा २६ वा व्हीटो**—अणुशक्तीवरील नियंत्रणाबाबत सिक्युरिटि कौन्सिलमध्यें ठराव आला असतांना, तो ९ वि. २ मतांनीं पास झाला. युक्राइन व सोव्हिअट युनियन ह्यांनीं विरोध केला. रशियानें सिक्युरिटि कौन्सिलमधील ठराव निष्फळ केल्याचें हें २६ वें उदाहरण आहे.

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

### उद्योगधंद्यास भांडवल पुरविणाऱ्या संस्थेचें स्वरूप

( इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनचे डायरेक्टर म्हणून हिंदुस्थान सरकारनें खालील गृहस्थांची नेमणूक केली आहे:—श्री. के. जी. आंबेगांवकर, सर जी. सी. घोष, श्री. खंडुभाई के. देसाई, सर वीरेंद्रनाथ मुकर्जी, पंडित के. संतानम्, श्री. माणेकलाल प्रेमचंद, श्री. जे. सी. दास, श्री. टी. ए. रामलिंगम चेट्टिअर व श्री आर. जी. सरय्या. सर श्रीराम व प्रा. ध. रा. गाडगीळ हे कॉर्पोरेशनवरील रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी आहेत. श्री. रामनाथ ह्यांचें नांव मॅनेजिंग डायरेक्टरचे जागेसाठी रिझर्व्ह बँकेनें सुचविलें आहे.)

### उद्देश

( १ ) हिंदुस्थान सरकारच्या १९४८ च्या १५ व्या कायद्यान्वयें ही कॉर्पोरेशन स्थापन झाली. हिंदुस्थानांतील उद्योगधंद्यांना मध्यम वा दीर्घ मुदतीचें भांडवल सुलभतेनें उपलब्ध करून देणें, हा तिचा उद्देश आहे. विशेषतः ज्या परिस्थितींत नेहमींच्या पद्धतींचें बँकांचें कर्ज युक्त ठरत नाहीं किंवा भांडवल उभारणी कठीण जाईल, अशा वेळीं कॉर्पोरेशनची मदत व्हावी अशी अपेक्षा आहे. पब्लिक लिमिटेड कंपनी किंवा सहकारी सोसायटी ह्या स्वरूपाच्या उद्योगधंद्यांचा विचार कॉर्पोरेशनकडून केला जाईल.

### भांडवल व त्याची वाटणी

( २ ) कॉर्पोरेशनचें अधिकृत भांडवल १० कोटी रुपये राहील आणि तें प्रत्येक शेअर ५,००० रुपयांचा, ह्याप्रमाणें २०,००० पूर्ण भरणा झालेल्या भागांत वाटलें जाईल. त्यांपैकी १०,००० शेअर्स प्रथम काढण्यांत येतील. बाकीचे १०,००० शेअर्स कॉर्पोरेशननें योग्य वाटेल त्या वेळीं मध्यवर्ती सरकारची मंजुरी घेऊन विक्रीस काढण्यास हरकत नाहीं. पहिल्या १०,००० शेअर्सपैकी मध्यवर्ती सरकार व रिझर्व्ह बँक प्रत्येकी २,००० शेअर्स घेतील; म्हणजे, प्रत्येकी १ कोटी रुपयांचें भांडवल देतील. शेड्यूल्ड बँकांच्या वाटणीस २,५०० शेअर्स येतील. विमा कंपन्या, इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स, इत्यादि संस्थांनाहि २,५०० शेअर्स मिळूं शकतील. सहकारी बँकांच्या वाट्यास १,००० शेअर्स ठेवले आहेत. ह्या सर्व शेअर्ससाठी अर्ज केव्हां स्वीकारले जातील, त्याची नोटीस सरकारी गॅझिटांत योग्य वेळीं प्रसिद्ध होईल. वरील यादीवरून, खासगी व्यक्तींना शेअर्स मिळणार नाहींत, हें दिसून येईल. मागूनहि ते त्यांच्या नांवें वर्ग होऊं शकणार नाहींत. शेड्यूल्ड बँका, विमा कंपन्या इत्यादींची त्यांच्या वाटणीस आलेल्या शेअर्स इतकी मागणी नसेल तर उरलेले शेअर्स मध्यवर्ती सरकार व रिझर्व्ह बँक ह्यांनीं घेऊन टाकावयाचे आहेत. म्हणजे, विक्रीस काढलेले परंतु न खपलेले असे शेअर्स शिल्लक रहाणार नाहींत. हे जास्त घेतलेले शेअर्स सरकार व रिझर्व्ह बँक शेड्यूल्ड बँका, विमा कंपन्या, इत्यादींस पुढें वर्ग करूं शकतील. पहिल्या ५ कोटी रुपयांच्या भांडवलाची ही व्यवस्था झाली. उरलेलें भांडवल विक्रीस काढण्यांत येईल, तेव्हांहि त्याची वरील प्रमाणांतच वाटणी केली जाईल. शेअर्सची रकम परत देण्याची सरकार हमी घेईल. त्याचप्रमाणें, शेअर्सवरील व्याजाच्या किमान दराचीहि सरकार हमी घेईल. हा दर शेअर्स विक्रीस काढण्याच्या वेळीं जाहीर करण्यांत येईल.

### व्यवस्था

( ३ ) कॉर्पोरेशनची व्यवस्था बोर्ड ऑफ डायरेक्टर्स, एक्झिक्यूटिव्ह कमिटी व मॅनेजिंग डायरेक्टर ह्यांनीं पहावयाची आहे. बोर्डानें 'व्यापारी धोरणानें' चालावयाचें आहे, परंतु सर्वसाधारण उद्योग, व्यापार व जनतेचें हित हेंहि त्यानें दृष्टीआड करावयाचें नाहीं. मध्यवर्ती सरकार धोरणाबाबत सूचना करील, त्या बोर्डानें मानल्या पाहिजेत. एकादी गोष्ट 'धोरणा'च्या ह्या व्याख्येंत बसते किंवा नाहीं, ह्याबाबत अखेरचा निर्णय हिंदुस्थान सरकारचा आहे.

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

( ४ ) बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची घटना खालीं दिली आहे.

| | |
|---|---|
| ( अ ) मध्यवर्ती सरकारनें नेमलेले. | ३ |
| ( ब ) रिझर्व्ह बँकेनें नेमलेले. | २ |
| ( क ) सभासद—शेड्यूल्ड बँकांनीं निवडलेले. | २ |
| ( ड ) सभासद—सहकारी बँकांनीं निवडलेले. | २ |
| ( इ ) इतर सभासद—संस्थांनीं निवडलेले. | २ |
| ( ई ) मध्यवर्ती सरकारनें नेमलेला मॅ. डायरेक्टर. | १ |
| एकूण | १२ |

शेड्यूल्ड बँका, सहकारी बँका व इतर सभासद—संस्था ह्यांनीं निवडावयाच्या डायरेक्टरांची निवडणूक एका वर्षानें होईल. तोंपर्यंतच्या मुदतीसाठीं ह्या सहा जागा सरकार नेमणुकीनें भरील. मध्यवर्ती सरकारला तीन डायरेक्टर नेमण्याचा तर कायमचाच अधिकार आहे. ह्या सहा + तीन = नऊ डायरेक्टरांची नेमणूक आतां जाहीर झाली आहे आणि रिझर्व्ह बँकेनेंहि आपले प्रतिनिधी नियुक्त केले असून मॅ. डायरेक्टरहि सुचविला आहे, तो मध्यवर्ती सरकारनें मान्य केला आहे.

### मुख्य कचेरी व इतर कचेऱ्या

( ५ ) कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी दिल्ली येथें राहील व मुंबई, कलकत्ता, कानपूर आणि मद्रास येथेंहि ती कचेऱ्या उघडील. इतर ठिकाणीं कचेऱ्या उघडण्यास सरकारची मंजुरी आवश्यक आहे.

### खेळत्या भांडवलाची उभारणी

( ६ ) कॉर्पोरेशननें खेळत्या भांडवलासाठीं व्याज देणारे बाँड व डिबेंचर्स विकण्यास हरकत नाहीं. अशा तऱ्हेची व अंडररायटिंगची वगैरे मिळून जोखीम कॉर्पोरेशनच्या वसूल भांडवलाच्या व रिझर्व्ह फंडाच्या पांच पटीपेक्षा अधिक होता कामा नये. कॉर्पोरेशनचे बाँड व डिबेंचर्स ह्यांचें मुद्दल व व्याज ह्याबाबत सरकार हमी घेईल. कॉर्पोरेशननें मुदती ठेवी स्वीकारण्यास हरकत नाहीं. मात्र ठेवींची किमान मुदत पांच वर्षांपेक्षा कमी असतां कामा नये. अशा ठेवींची कमाल मर्यादा १० कोटी रुपयांची बांधून दिलेली आहे.

### कॉर्पोरेशनच्या व्यवहारांचें वर्णन

( ७ ) कॉर्पोरेशननें मुख्यतः खालील व्यवहार करावयाचे आहेत:—

( अ ) उद्योगधंद्यांनीं ( कंपन्या व सहकारी सोसायट्या ) उभारलेल्या कर्जाची हमी घेणें. ह्या कर्जाच्या परत फेडीची कमाल मुदत २५ वर्षें असावी आणि तीं कर्जें बाजारांत उभारण्यांत आलीं असलीं पाहिजेत.

( ब ) उद्योगधंद्यांचे स्टॉक, शेअर्स, बाँड्स, डिबेंचर्स, इत्यादि अंडरराइट करणें.

( क ) वरील दोन्ही व्यवहारांचे पोटीं ठरलेलें कमिशन घेणें.

( ड ) अंडररायटिंगच्या व्यवहारांत कांहीं स्टॉक, शेअर्स वगैरे कॉर्पोरेशनच्या गळ्यांत पडले, तर ते धारण करणें. मात्र ७ वर्षांचे आंत त्यांचा निकाल लावला पाहिजे.

( इ ) उद्योगधंद्यांना कर्ज देणें, त्यांचीं डिबेंचर्स घेणें. परत फेडीची कमाल मुदत २५ वर्षांची असली पाहिजे.

(अ) आणि (इ) ह्या अन्वये करावयाच्या व्यवहारास पुरेशी मालमत्ता, सरकारी व इतर रोखे, शेअर्स, सोनें, इत्यादि अवश्यमेव तारण लावून घेतली जातील. कोणत्याहि एका उद्योगधंद्यास कॉर्पोरेशनच्या वसूल भांडवलाच्या १०% पेक्षा मोठी मदत मिळणार नाहीं; आणि ती ५० लक्ष रुपयांपेक्षाहि अधिक असणार नाहीं. कॉर्पोरेशनच्या हिताच्या दृष्टीनें आवश्यक त्या अटी (उ. आपला डायरेक्टर त्यांचेवर नेमणें.) उद्योगधंद्यांस बंधनकारक करण्याचा तिला अधिकार आहे. कांहीं झालें तरी कोणत्याहि लिमिटेड कंपनीचे शेअर्स कॉर्पोरेशन प्रत्यक्ष विकत घेणार नाहीं. कॉर्पोरेशन जरूर तर परदेशी चलनांत कर्जे उभारील व त्यास आवश्यक तें तारण देईल. कर्जे घेणाऱ्या उद्योगधंद्यांस अटी पाळतां आल्या नाहींत, तर त्याबाबत योग्य ते अधिकार कॉर्पोरेशनला आहेत आणि ठरलेल्या वेळेचे अगोदरहि जरूर वाटलें तर कर्ज परत मागण्याचा तिला अधिकार आहे.

### गंगाजळी व डिव्हिडंड

(८) कॉर्पोरेशन रिझर्व्ह फंड निर्माण करील आणि बुडीत व संशयित कर्जांची तरतूद करून व घसारा वगैरे काढून निव्वळ नफा उरेल त्यांतून डिव्हिडंड देईल. डिव्हिडंडचा कमाल दर ५% आहे. रिझर्व्ह फंड भाग भांडवलाइतका झाला, म्हणजे ५% डिव्हिडंड देऊन उरलेला नफा मध्यवर्ती सरकारास दिला जाईल. इनकम टॅक्सच्या दृष्टीनें कॉर्पोरेशन ही इतर कंपन्यांप्रमाणेंच समजली जाईल व तिचेवर इनकम टॅक्स व सुपरटॅक्स आकारण्यांत येईल.

### रिझर्व्ह बँक व "बंगाली" बँका

रिझर्व्ह बँकेनें कलकत्ता येथील एका बँकेस शेड्यूलमधून काढलें आणि त्यामुळें त्या बँकेकडे पैशाची भरमसाट मागणी येऊन तिला दरवाजे बंद करावे लागले, अशी तक्रार आहे. "बंगाली" बँकां विरुद्ध कट रचलेला आहे, अशी तेथील एका वर्तमानपत्रांत ओरड होण्यापर्यंत स्थानिक ठेवीदारांची मजल गेली आहे! बंद पडलेल्या बँकेच्या ठेवीदारांनीं येत्या चार महिन्यांत आपल्या ठेवींपैकीं २५% पेक्षा अधिक रक्कम न काढण्याचें आपण होऊन ठरविलें आहे. परत ठेव घेण्याची ५,००० रु. ची कमाल मर्यादाहि त्यांनीं मान्य केली आहे.

### नागपूर ग्लास वर्क्स लिमिटेड

जानेवारी १९४८ मध्यें कंपनीनें आपला एक भाग (दर्शनी किंमत रु. १००) प्रत्येकी रु. २५० (रु. १०० किंमत + रु. १५० वाढावा) चे भावानें विकला आहे. दि. १३-६-४८ रोजीं भरलेल्या संचालक मंडळाचे सभेमध्यें त्याच तारखेस पटावर असलेल्या भागीदारांना त्यांचे नांवावर असलेल्या भागांइतकेच आणखी भाग (प्रत्येकी दर्शनी किं. रु. १००) प्रत्येक भागाबाबत फक्त रु. ४० घेऊन देण्याचें ठरविलें आहे. बाकीचे रु. ६०, प्रत्येकी भागापोटी कंपनी आपले गंगाजळींतून भरणार आहे. याचा अर्थ ता. १३-६-४८ नंतर कंपनीचे प्रत्येक भागाची वाजवी किंमत रु. १४५ ही आहे. ता. ३१-३-४८ रोजीं पुरे होणारे सालाबाबत संचालक मंडळानें जुन्या प्रत्येक भागाला रु. १६ मुनाफा वाटण्याची शिफारस केली आहे.

### हिंद सायकल्स लि., मुंबई

वरील कंपनीनें ऑर्डिनरी भागांवर आतां प्रथमच डिव्हिडंड जाहीर केलें आहे. कंपनी आठ वर्षांपूर्वी स्थापन झाली. १९४७ मध्यें कंपनीस ३,०३,६४४ रु. नफा झाला. त्यांतून घसाऱ्यासाठी १,५६,००० रु. बाजूस काढण्यांत आले. एकूण खर्चाच्या रकमेपैकीं ४९·४५% रकम कच्चा माल व स्टोअर्स ह्यांवर खर्च झाली, कामगारांच्या मजुरीस २८·२०% रकम लागली, १५·७५% इतर खर्च झाला, ३·३५% घसाऱ्यासाठी बाजूस काढली आणि ३·२५% नफा झाला.


'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

कृष्णा शुगर मिल्स लि.

कृष्णा-किचूर

कन्फेक्शनरी सुरू झाली.

धंद्याच्या वाढीसाठी ठेवी स्वीकारल्या जातात.

६% क्यु. प्रेफरन्स शेअर्स विक्रीस आहेत.

विशेष माहितीसाठी लिहा.

पोस्टः—कृष्णा-किचूर
जिल्हाः—बेळगांव.
विंचूरकर ॲण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर (जि. नाशिक), खोपोली पे ऑफिसः

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९६,१४५ |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

० गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.

० मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.

० बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.

**कृत्रिम सरबताच्या बाटल्यांवरील लेबलें**—अलिकडे कृत्रिम सरबताच्या बाटल्यांवर कांहीं कारखानदार दिशाभूल करणारीं लेबलें लावतात असें दिसून येतें. ह्या लेबलांवर बहुधा एखाद्या फळाचें रंगीबेरंगी चित्र असतें; किंवा 'ताज्या फळापासून केलेले,' असे शब्द असतात. पुष्कळदा ह्या बाटल्यांतून असलेलीं सरबतें कृत्रिम बनावटीचीं असतात; व तरीसुद्धां वरील प्रकारचीं लेबलें त्यांवर लावण्यांत येतात. "सिन्थेटिक" हा शब्द कोठें तरी अगदीं बारीक अक्षरांत असतो. ह्या बाबतींत सरकारनें एक पत्रक काढून पुढील प्रमाणें खुलासा केला आहे. ( १ ) कृत्रिम सरबताच्या बाटल्यांवरील लेबलांवर 'फळ' हा शब्द असतां कामा नये. ( २ ) फळाचें चित्रही अशा लेबलांवर असतां कामा नये. ( ३ ) लेबलावर 'सिन्थेटिक' (कृत्रिम) हा शब्द ठळकपणें दिसेल असा असला पाहिजे; त्याचा मराठी, गुजराथी, अगर हिंदी प्रतिशब्दही असावा ( ४ ) कोणाही कारखानदारानें लेबलावर आपला परवाना-नंबर घालतां कामा नये. कृत्रिम सरबतें करणारांनीं वरील गोष्टी लक्षांत ठेवून त्याप्रमाणें वागावें, अशी सरकारची अपेक्षा आहे.

**मोटारमय अमेरिका**—अमेरिकेंत प्रत्येक १०० माणसांगणिक ३८ मोटारी आहेत. तेथें एकूण ३ कोटी, ७० लक्ष मोटारी नोंदलेल्या आहेत. अमेरिका वगळून बाकीच्या जगांत १ कोटी, ५४ लक्ष मोटारी आहेत. म्हणजे, तेथें १३० माणसांगणिक एक मोटार असें प्रमाण पडतें. अमेरिकन मोटार कारखानदारांना मोटारींची मागणी पुरी पाडतां येत नाहीं.

**टाटा शेअर भांडवलाची पुनर्घटना**—टाटा डिफर्ड शेअर्सच्या पुनर्रचनेच्या योजनेबाबत टाटा कंपनी व तिचे प्रमुख भागीदार ह्यांचेमध्यें वाटाघाटी चालू आहेत. ता. ४ जून व ता. २३ जून रोजीं चर्चा झाली. ३,००,००० नवे डिफर्ड शेअर्स विक्रीला काढावे; हे शेअर्स प्रत्येकी १०० रुपयांस म्हणजे ७० रु. वाढाव्यानें विकावे, व एका डिफर्ड शेअरला सहा नवे डिफर्ड ह्या दरानें शेअर्स मिळावे अशी योजना कंपनीनें आतां पुढें मांडली आहे. डिफर्डची मूळ भरणा किंमत ३० रु. आहे. ह्या योजनेचा विचार करण्यासाठी भागीदारांनीं मुदत मागून घेतली आहे. कंपनीची पहिली योजना डिफर्डचे ऑर्डिनरी भागांत रूपांतर करण्याची होती.

**बँका १ जुलै रोजीं बंद**—बँकांना आपले सहामाही हिशेब पुरे करतां यावेत, ह्यासाठी १ जुलै ह्या दिवशीं सरकारनें सुटी जाहीर केली आहे. मुंबई, पुणें, अहमदाबाद, नाशिक, देवळाली, सुरत, भडोच, सोलापूर, नाडिआद, गोध्रा आणि धुळें येथील बँकांसच ही सुटी लागू आहे.

**बेलारपूर पेपर अँड स्ट्रॉ बोर्ड मिल्स लि., नागपूर**—वरील कंपनीनें आपल्या २ कोटी रुपयांच्या भांडवलापैकी १ कोटी रुपयांचे शेअर्स विक्रीस काढले आहेत. मध्यप्रांत सरकार ५०,०१,००० रुपयांचे शेअर्स घेणार आहे आणि यंत्रसामुग्री पुरविणारी कनेडिअन कारखानदार कंपनी १६,६०,००० रुपयांचे भाग घेत आहे. जेवढें कांहीं भांडवल खपणार नाहीं तेवढें ४, व्याजाच्या १० वर्षें मुदतीच्या बाँडसचे स्वरूपांत मध्यप्रांत सरकार देणार आहे. चांदा ह्या शहराशेजारीं कारखाना उभारण्यांत येईल. हिंदुस्थानांत दरमाणशीं कागदाचा खप फक्त १ पौंड आहे; अमेरिकेंत तो २४१, कॅनडांत १७५ व ग्रेटब्रिटनमध्यें १५४ पौंड आहे. वाढत्या शिक्षणप्रसारामुळें हिंदी कागद गिरण्यांस चांगला वाव निर्माण होत आहे.


**शेतकरी कर्जनिवारण कायदा**

कापडी किं. ४॥ रु. कागदी किं. ४ रु.

| | |
|---|---|
| नवीन भाडें नियंत्रण कायदा | किं. २ रु. |
| मुंबई सावकारी कायदा | किं. २॥ रु. |
| कूळ कायदा, आवृत्ति ३ री | किं. ३ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता— लॉ ॲकेडेमी, ७२० सदाशिव पुणें २.

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

**— शेड्यूल्ड बँक —**

| | |
|---|---|
| वसूल झालेलें भांडवल | रु. १६,००,००० |
| रिझर्व व इतर फंड | रु. ४,१०,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. २,००,००,००० |

**संचालक मंडळ**

श्री. धों. कृ. साठे, ( चेअरमन ), श्री. वा. पुं. वर्दे (व्हा. चेअरमन), श्री. न. ग. पवार, श्री. श्री. गो. मराठे, श्री. मा. रा. जोशी, श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा. वि. शहा, श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुते, श्री. मो. रा. ढमढेरे.

**ट्रस्टी व एक्झीक्युटरचे कामाबाबत चौकशी करा.**

मुख्य कचेरी : लक्ष्मी रोड, पुणें २

**चिं. वि. जोग,** मॅनेजर.







हें पत्र पुणें, पेठ भांबुडा घ. न. ११५१।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.